Mahindra
Rise.

# महिन्द्रा अ‍ॅण्ड महिन्द्रा लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** गेटवे बिल्डिंग, अपोलो बंदर, मुंबई-४०० ००१. कंपनी ओळख क्रमांक: एल्६५९९०एम्एच्१९४५पीएल्सी००४५५८
वेबसाइट: www.mahindra.com • ईमेल: investors@mahindra.com • टेलि.: +९१ २२ २२८९५५०० • फॅक्स: +९१ २२ २२८७५४८५

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-मतदानाविषयी माहिती

याद्वारे सूचना देण्यात येते की महिन्द्रा अ‍ॅण्ड महिन्द्रा लिमिटेडची एकोणसत्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) शुक्रवार दि. ७ ऑगस्ट २०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता, बिर्ला मातोश्री सभागर, १९, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, (न्यू मरीन लाइन्स), मुंबई ४०० ०२० येथे भरविण्यात येईल. या सभेत केल्या जाणाऱ्या सर्वसामान्य व विशेष व्यवहारांविषयीची सूचना आणि त्यासोबत वार्षिक अहवाल ज्यात (१) दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित हिशोब आणि संचालक मंडळांचे व लेखापरीक्षकांचे अहवाल; (२) दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित एकत्रित हिशोब व लेखापरीक्षकांचा त्यावरील अहवाल आणि (३) अटेंडन्स स्लिप व प्रॉक्सी फॉर्म यांचा समावेश आहे. हे सर्व सभासदांना पोस्टाने/कुरियरने त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर आणि ज्या सभासदांनी आपले ई-मेल पत्ते कंपनीकडे किंवा डिपॉझिटरी यांच्याकडे नोंदविलेले आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे पाठविण्यात आले आहेत.

कृपया याची नोंद घ्या की ही सर्व कागदपत्रे/हा दस्तैवज तुम्हाला त्वरित संदर्भ मिळावा यासाठी कंपनीच्या www.mahindra.com या वेबसाइटवरही अपलोड करण्यात आले असून ते कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातही तपासणीसाठी कोणत्याही कामाच्या दिवशी कामाच्या वेळात उपलब्ध करण्यात येईल. तथापि, एखाद्या सभासदास या वर नमूद केलेल्या दस्तैवजाच्या प्रत्यक्ष प्रती हव्या असल्यास त्यांनी investors@mahindra.com येथे आपला डीपी आयडी आणि क्लाएंट आयडी/फोलियो क्र.नमूद करणारी ई-मेल पाठवावी.

एजीएमसाठी उपस्थित राहून मत देण्यास पात्र असलेला सभासद त्याच्या ऐवजी सभेस उपस्थित राहण्यासाठी आणि मत देण्यासाठी प्रॉक्सी(प्रतिनिधी) नेमण्यास पात्र आहे आणि असा प्रॉक्सी(प्रतिनिधी) सभासद असण्याची गरज नाही.

कंपनी कायदा २०१३चे कलम १०८, कंपन्या (व्यवस्थापन आणि आस्थापना) नियम २०१४ सुधारितच्या नियम २० यांच्यासोबत वाचले असता आणि लिस्टिंग कराराच्या कलम ३५ बी अन्वये कंपनीला आपल्या ६९व्या एजीएममध्ये/वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये केल्या जाणाऱ्या व्यवसायाच्या बाबतीत तिच्या सभासदांना ई-मतदान सुविधा देताना आनंद होतो आहे. दूरस्थ ई-मतदान सुविधा पुरविण्यासाठी कंपनीने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एन्एस्डीएल्) यांच्या सेवेची नियुक्ती केली आहे.

हे दूरवरून केले जाणारे ई-मतदान सोमवार दि. ३ ऑगस्ट २०१५ रोजी सकाळी ९ वाजता (आयएसटी-भारतीय प्रमाण वेळ) सुरू होईल आणि गुरूवार दि. ६ ऑगस्ट २०१५ रोजी संध्याकाळी ५ वाजता (आयएसटी-भारतीय प्रमाण वेळ) संपेल. हे दूरवरून केले जाणारे ई-मतदान या दिलेल्या तारखेच्या आणि वेळेच्या नंतर करण्यास परवानगी असणार नाही. सभासदाने एकदा मत दिल्यावर तो/ती पुन्हा त्यानंतर ते मत बदलू शकणार नाही.

ज्या व्यक्तीचे, कट ऑफ तारखेच्या दिवशी म्हणजे शुक्रवार दि. ३१ जुलै २०१५ रोजी सभासदांच्या रजिस्टरमध्ये किंवा डिपॉझिटरीजनी तयार केलेल्या लाभार्थींच्या यादीमध्ये नाव आढळेल तीच व्यक्ती दूरस्थ ई-मतदानाच्या सुविधेचा लाभ घेण्यास तसेच एजीएमच्या वेळी मत देण्यास पात्र असेल.

भागधारकांचा मतदानाचा हक्क कट ऑफ तारखेच्या दिवशी कंपनीकडे भरणा झालेल्या समभाग भांडवलामध्ये त्यांचा जो हिस्सा आहे त्या प्रमाणात असेल. कोणतीही व्यक्ती जी कंपनीचे भाग/शेअर्स मिळवून कंपनीच्या एजीएमची सूचना रवाना झाल्यावर कंपनीची सभासद होईल आणि कट ऑफ तारखेच्या दिवशी त्याच्या/तिच्याकडे भागधारणा असेल ती व्यक्ती evoting@nsdl.co.in इथे किंवा investors@mahindra.com इथे विनंती पाठवून युजर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते.

कंपनीने एन्एस्डीएल्ची इलेक्ट्रॉनिक मतदान पध्दती जी दूरस्थ ई-मतदान वेळी वापरण्यात येणार आहे तीच एजीएमच्या वेळी पुरविण्याचा पर्याय निवडला आहे. ही सुविधा एजीएमच्या वेळी सर्व ठराव विचारात घेईपर्यंत आणि त्यावर मतदान होईपर्यंत कार्यरत राहील. तसेच ह्या सुविधेचा वापर ज्यांच्याकडे कट ऑफ तारखेच्या दिवशी भागधारणा आहे आणि ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे यापूर्वीच आपले मत दिलेले नाही फक्त अशा एजीएमसाठी हजर असणाऱ्या सभासदांनाच करता येईल. दूरस्थ ई-मतदानाद्वारे आपला मतदानाचा हक्क बजावल्यावर एखाद्या सभासदास एजीएमला उपस्थित राहता येईल परंतु त्यांना पुन्हा एजीएममध्ये मतदान करण्यास परवानगी नाही.

एजीएमची सूचना कंपनीच्या http://www.mahindra.com/Investors/Mahindra-and-Mahindra/Resource तसेच एन्एस्डीएल्च्या https://www.evoting.nsdl.com या वेबसाइटवर उपलब्ध आहे. दूरस्थ ई-मतदानाची पध्दत/प्रक्रिया एजीएमच्या सूचनेमध्ये तसेच एन्एस्डीएल्च्या https://www.evoting.nsdl.com या वेबसाइटवर उपलब्ध आहे. ई-मतदानाच्या संदर्भात काही शंका/समस्या असल्यास, सभासदांनी त्यांच्यासाठी उपलब्ध असणाऱ्या https://www.evoting.nsdl.com येथील डाऊनलोड विभागातील फ्रिक्वेंटली आस्कड् क्वेश्चन्स् (एफ्एक्यू-नेहमी विचारले जाणारे प्रश्न) आणि ई-मतदान संबंधित युजर मॅन्युअल पहावे. ई-मतदानाच्या संदर्भात काही स्पष्टीकरण/अडचणी (समस्या) असल्यास सभासदांनी श्री. राजीव रंजन, असिस्टंट मॅनेजर, एन्एस्डीएल् यांच्याशी ट्रेड वर्ल्ड येथे ए विंग, ४था आणि ५वा मजला, कमला मिल्स कंपाउंड, लोअर परळ, मुंबई ४०० ०१३ येथे किंवा evoting@nsdl.co.in या ई-मेल आयडीवर किंवा RajivR@nsdl.co.in येथे किंवा ०२२-२४९९४६००/०२२-२४९९४७३८ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा.

**महिन्द्रा अ‍ॅण्ड महिन्द्रा लिमिटेडसाठी**
सही/-
नारायण शंकर
कंपनी सचिव

स्थळ: मुंबई
तारीख: १४ जुलै २०१५